# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

### बैठक क्र. ४९

### दिनांक : २० फेब्रुवारी २०१८

---

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 49 , दि.20.02.2018 रोजी सकाळी 11.30 ते 4.30 या वेळेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील संगणक हॉल, शैक्षणिक इमारत- येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

1. डॉ. कविता साळुंके — अध्यक्ष, प्र.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
2. डॉ. चंद्रकांत बोरसे — सदस्य, प्राचार्य, म.वि.प्र. समाजाचे बी.एड. कॉलेज, नासिक
3. प्रा.डॉ. एस.व्ही. एस.चौधरी — सदस्य, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी, न्यु दिल्ली
4. प्रा.डॉ. आर.बी. मानेकर-- सदस्य, प्राचार्य, शास.अध्यापक महाविद्यालय,अकोला
5. डॉ. संजिवनी महाले— सदस्य व सचिव, सह. प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
6. डॉ. विजया पाटील — सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद
7. प्रा. विजयकुमार पाईकराव —सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
8. डॉ. डी.डी. पवार- सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
9. डॉ. सुभाष सोनूने — सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
10. डॉ. हेमंत राजगुरु — सदस्य, प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
11. प्रा. माधव पळशीकर, -- सदस्य, प्र.संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा
12. प्रा. डॉ. जयदिप निकम -- सदस्य, प्र.संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा
13. डॉ. लेसन आझादी, — निमंत्रित सदस्य, संचालक, बहाई अँकेडमी, पांचगणी

बैठकीस खालील सदस्य त्यांच्या वैयक्तीक अडचणींमुळे उपस्थित राहू शकले नाही.

- प्रा.डॉ. उर्मिला धूत -- सदस्य,प्राचार्य,शासकिय अध्यापक महाविद्यालय, परभणी
- डॉ. विजय जवळेकर - सदस्य, प्राचार्य, चेंबुर बी.एड. कॉलेज, मुंबई
- प्रा. डॉ. सुरेश पाटील - सदस्य, प्राध्यापक, मूल्यमापन केंद्र

| क्रमांक | उपक्रमांक | तपशील |
|---|---|---|
| ४९.१ | | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०१<br>उपस्थित सदस्यांचे स्वागत<br>सभेच्या सुरुवातीला उपस्थित सदस्यांचे स्वागत करण्यात आले. |
| ४९.२ | | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०२<br>४८ व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे इतिवृत्त व अहवाल (सहपत्र क्र-१ व २)<br>दि. 28.10.2017 रोजी झालेल्या 48 व्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठकीचे आणि कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली. ( सहपत्र क्र. 1 व 2) |
| ४९.३ | ४९.३.१ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०३<br>**बी. एड. प्रवेशासाठी पूर्वी उत्तीर्ण झालेल्या शिक्षणक्रमांना गुण देणेबाबत...**<br>**टिप्पणी :**<br>बी. एड. शिक्षणक्रमात मेरीट लिस्ट तयार करताना विद्यापीठाच्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमास दोन, ि शिक्षणक्रमास तीन, पदवी शिक्षणक्रमास चार, पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमास पाच आणि स शिक्षणक्रमाला सहा या पद्धतीने प्रत्येक पातळी साठी एकदा गुण देण्यात येतात. २०१४ पूर्व प्रमाणपत्र शिक्षणक्रम तीन महिन्यांचे होते. २०१४ नंतर UGC ने किमान सहा महिन्याचा प्र शिक्षणक्रम असल्यास प्रमाणपत्र शिक्षणक्रम मान्यता असे म्हणून मार्गदर्शन केल्याने विद्या पूर्वीच्या तीन महिन्याच्या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे गुण बी. एड. प्रवेशप्रक्रियेत धरावेत की नाही अ निर्माण झाला.परंतु यु. जी. सी. च्या नियमापुर्वीचे प्रमाणपत्र शिक्षणक्रम ज्या गुणांचे असतील प्रमाणपत्रासाठी गृहीत धरण्यात यावे असे वाटते.<br>चर्चा व मान्यतेसाठी सादर.<br>**निर्णय :** उपरोक्त विषयावर चर्चा करण्यात आली. यु.जी.सी.ने 2014 नंतर प्रमाणपत्र शि किमान सहा महिन्यांचा असावा, असे म्हटले आहे. मात्र या विद्यापीठात 2014 पूर्वी काही शिक्षणक्रम तीन महिन्यांचे होते. विद्यापीठाचे 2014 पूर्वीचे तीन महिन्यांचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांनी केले असले तरी त्याचा लाभ 2018 मध्ये आपण देणार असल्याने काही तांत्रिक होऊ शकतात. असा प्रश्न चर्चेत आला. त्यावर सदर शिक्षणक्रम केवळ बी.एड. प्रवेश यादीतील गुणवत्तेच्या घटकातील केवळ एका मुद्यासाठी विचारात घेण्यात येईल असे स आले. त्यानंतर सदर शिक्षणक्रम म्हणजे बी.एड. प्रवेशाची प्रवेश पात्रता नाही. परीणामतः अ शिक्षणक्रमांना दोन गुणांचे वेटेज देण्यास मान्यता देण्यात आली व सदर विषय मान्यतेसाठी शिफारस करण्यात आला. |
| | ४९.३.२ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०४<br>**बी. एड. प्रवेश प्रक्रियेत २०१८ पासून केलेले बदल मान्यतेसाठी सादर. (सहपत्र** |

| | | |
|---|---|---|
| | | **टिप्पणी :**<br>बी. एड. शिक्षणक्रम २०१८ – २० च्या तुकडीसाठी विकेंद्रित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित केली जाणार आहे. त्याचा विचार करून बी. एड. प्रवेशाचे नवीन नियम व प्रक्रिया तयार केली आहे. सहपत्र क्र. ३ मध्ये ती जोडण्यात आलेली आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :**2018 पासून बी.एड. प्रवेश प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हानिहाय गुणवत्ता यादी असेल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विभागीय केंद्रांवर करण्यात येईल. या संदर्भात सहपत्र क्र. 3 मध्ये दिलेल्या प्रवेश प्रक्रियेतील बदलांना मान्यता देण्यात आली. सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.३ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०५<br>**ठाणे व पालघर या दोन जिल्ह्यांना एकच अभ्यासकेंद्र देणेबाबत..**<br>**टिप्पणी :** बी. एड. शिक्षणक्रमासाठी NCTE ने प्रत्येक जिल्ह्याला एक या प्रमाणे अभ्यासकेंद्र निश्चित करून दिलेली आहेत. ठाण्यातून पालघर जिल्हा स्वतंत्र केल्यानंतर त्या संदर्भातले पत्र NCTE ला पाठविण्यात आले होते. परंतु अद्यापही पालघर जिल्ह्यासाठी केंद्र मान्यता पत्र प्राप्त न झाल्याने ठाणे व पालघर या दोन्ही जिल्ह्यासाठी सेवासदन शिक्षणशास्त्र महाविद्यालय उल्हासनगर हे केंद्र देण्यास मान्यता मिळावी. चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** NCTE ने प्रत्येक जिल्ह्याला स्वतंत्र अभ्यासकेंद्र व प्रत्येकी 40 ते 42 विद्यार्थीसंख्या निश्चित करुन दिली आहे. ठाणे जिल्ह्यातून पालघर जिल्हा स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने NCTE कडे केलेल्या पत्रव्यवहाराला अद्यापपर्यंत उत्तर प्राप्त न झाल्यामुळे सध्यातरी ठाणे – पालघर ह्या दोन जिल्ह्यांची एकत्रित गुणवत्ता यादी तयार करुन ठाणे जिल्ह्यासाठी निश्चित केलेल्या उल्हासनगर येथील बी.एड. अभ्यासकेंद्रावर पूर्वी प्रमाणेच 40 /42 प्रवेश ठाणे व पालघर मिळून एकत्रित करण्यास मान्यता देण्यात आली. सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.४ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०६<br>**बी. एड. शिक्षणक्रमातील विविध विषयांच्या पाठ्यक्रम व लेखक समिती मान्यतेबाबत... (सहपत्र क्र. ४)**<br>**टिप्पणी :** बी. एड. शिक्षणक्रमात नऊ विषयांचे लेखन कार्य हाती घेण्यात आलेले आहे ते नऊ विषय पुढीलप्रमाणे-<br>१) ज्ञान आणि अभ्यासक्रम<br>२) अभ्यासक्रम आणि भाषा<br>३) माहिती संप्रेषण तंत्रविज्ञानाचा उपयोग<br>४) आंतरवासिता<br>५) लिंग शाळा व समाज<br>६) समकालीन भारत आणि शिक्षण<br>७) नाट्य व कलेचा शिक्षणात वापर<br>८) स्व आकलन / स्व शोध |

| | | |
|---|---|---|
| | | ९) वाचन आणि विमर्षण<br>या नऊ विषयांच्या पाठ्यक्रम विकसन, व लेखक समित्यांच्या याद्या आणि तयार केलेला नवी<br>सहपत्र क्र. ४ मध्ये जोडलेला आहे. कार्योत्तर मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** बी.एड.शिक्षणक्रमातील उपरोक्त शिक्षणक्रमांच्या सहपत्र क्र.4 मधील लेखक व<br>विकसन समित्यांना मान्यता देण्यात आली. स्वशोध व स्व आकलन या अभ्यासक्रमात ड<br>पाटील यांचे नांव घेण्यात आले. सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस<br>आली. |
| | ४९.३.५ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०७<br>**मूल्यशिक्षणाची मूलतत्वे या शिक्षणक्रमात अंतिम लेखी परीक्षेचा समावेश करणेबाबत...**<br>**टिप्पणी :** मूल्यशिक्षणाची मूलतत्वे या शिक्षणक्रमाच्या पथदर्शी प्रकल्पात अंतिम लेखी परीक्षेचा स<br>नव्हता. परंतु या शिक्षणक्रमाच्या प्राप्त प्रत्याभरणातून दोन्ही विषयांना प्रत्येकी ८० गुणांची अंतिम<br>परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** मूल्य शिक्षणाची मूलतत्वे या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची अंतीम परीक्षा केवळ मौखिक प<br>आधारीत होती. परंतु 2017 च्या तुकडीपासून या शिक्षणक्रमातील दोन्ही सैध्दांतिक विषयांना प्रत्ये<br>गुणांची अंतिम लेखी परीक्षा 80:20 या परीक्षा पध्दतीनुसार घेऊन मूल्यमापन करण्यात यावे<br>केंद्रावरील कामकाजामध्ये साशंकता राहणार नाही. तसेच शिक्षणक्रमाच्या मूल्यमापनाची विश्व<br>वाढीस लागेल. अशी चर्चा करुन मूल्यशिक्षणाची मुलतत्वे या प्रमाणपत्र शिक्षणक्रमात दोन्ही सै<br>विषयासाठी अंतिम लेखी परीक्षेचा 80:20 प्रकारानुसार सामावेश करण्यास मान्यता देण्यात आ<br>विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.६ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०८<br>**मूल्यशिक्षणाच्या पदविका अभ्यासक्रमाबाबत... (सहपत्र – ५)**<br>**टिप्पणी :** मूल्यशिक्षणाची मूलतत्वे या प्रमाणपत्र शिक्षणक्रमात दोन मॉड्यूल्सची भर घ<br>पदविका शिक्षणक्रमही कार्यन्वित करणे बाबतचा प्रस्ताव बहाई अ‍ॅकॅडमी पाचगणी येथून अ<br>सदर प्रस्ताव चर्चा व मान्यतेसाठी सादर... (प्रस्ताव सहपत्र– ५ मध्ये जोडलेला आहे.)<br>**निर्णय : मूल्यशिक्षण पदविका सुरु करणेबाबत..**<br>मूल्यशिक्षणाच्या पदविका अभ्यासक्रमासंदर्भात डॉ.लेसन आझादी यांनी सहपत्र 5 मध<br>सादरीकरण केले, त्यावर पुढील मुद्द्यांवर चर्चा होऊन सदर प्रस्ताव सर्व सदस्यांनी बा<br>त्यावर पुनश्च एकदा चर्चा करावी असे सूचित करण्यात आले. सभेमध्ये प्रस्ताव स<br>उपस्थित झालेले मुद्दे पुढीलप्रमाणे -<br>• लक्षगटातील सर्व प्रकारास एकाच प्रकारचा कोर्स उपयुक्त ठरेल का .?<br>• किमान अर्हता दहावी की बारावी ते स्पष्ट असावे.<br>• पालक, व्यावसायिक, शिक्षक, प्रशासकीय व्यक्ती अश्या वैविध्यपूर्ण गटाल<br>साहित्य कसे विकसित करता येईल.- |

| | | |
|---|---|---|
| | | • शिक्षणक्रमाची गरज पृथ:करण (Need Analysis) मांडावे.<br>• उद्दीष्टांवर पुन्हा एकदा विचार करावा. पदविका स्तरावरची ही उद्दिष्टे असावीत.<br>• पदविका स्तरांवर गुणात्मक संशोधन करुन घेणे शक्य होईल का?<br>• शिक्षणक्रमातील घटकांची श्रेयांक व गुणविभागणी अभ्याससाहित्य विकसनात मुक्त विद्यापीठाची भूमिका आणि अध्ययन साहित्याचे स्वामित्व, हक्क /अधिकार या बाबत पुन्हा विचार होणे आवश्यक.<br>• या क्षेत्रात कार्य करणाऱ्या तज्ज्ञांच्या मदतीने विद्याशाखेमध्येच सदर शिक्षणक्रम विकसित करता येईल का ? यावरही विचार करावा<br>• विद्यापीठ आणि बहाई अँकेडमी यांचेतील परस्पर सामंजस्य करार कसा असावा या बाबत विद्याशाखेतील सर्व प्राध्यापकांनी तसेच स्कूल कौन्सिल सदस्यांनी बहाई अकादमी येथून प्राप्त सहपत्राचे पुन्हा एकदा वाचन करुन त्यावर चर्चा करावी. आणि सदर विषय चर्चेअंती पुढील बैठकीमध्ये ठेवावा असे ठरविण्यात आले. |
| | ४९.३.७<br><br>शिक्षण प्रमाणपत्र | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/०९<br>**समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करणेबाबत....**<br>**टिप्पणी :**<br>एन.सी.टी.ई. ने २०१४ अभ्यासक्रमात ' समावेशित शिक्षण' या अभ्यासक्रमाचा समावेश केलेला आहे शिक्षण हक्क कायदा २००९ नुसार दिव्यांग बालक नियमित शाळेत शिक्षणासाठी येतात. परंतु सेवांतर्गत शिक्षकांना दिव्यांग बालकांना अध्यापन कसे करावे ह्याबाबतचे प्रशिक्षण नाही. या शिक्षणक्रमात पुढील अभ्यासक्रमांचा समावेश असेल -<br>१) समावेशित शिक्षण संकल्पनेचे बदलते स्वरूप.<br>२) दिव्यांगांच्या प्रकारात काळानुरूप झालेले बदल.<br>३) ज्ञानेंद्रियांधारित अध्ययनशैली आणि अध्ययन अध्यापन प्रक्रिया.<br>४) दिव्यांगांच्या समावेशित शिक्षणाच्या यशस्वितेसाठी विविध घटकांचे कार्य.<br>सहा महिन्यांचा समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्यास मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** 'समावेशित/शिक्षणक्रम' हा शिक्षणक्रम अत्यंत गरजेचा असून हा शिक्षणक्रम तयार करतां NCERT ने या संदर्भात तयार केलेला शिक्षणक्रम अभ्यासक्रम आराखडा पाहावा कारण त्यांनी संपू भारतातील तज्ज्ञांच्या मदतीने तो शिक्षणक्रम तयार केलेला आहे असे सुचवून या विषयास मान्यत देण्यात आली. सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.८ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१०<br>**बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र (C-31) शिक्षणक्रम अध्ययनार्थीना प्रमाणपत्र मिळणेबाबत...**<br>**टिप्पणी :** 'बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र' (C-31) उत्तीर्ण विद्यार्थ्यांना केवळ गुणपत्र देण्यात येतात. परंतु विद्यार्थ्यांची अभ्यासकेंद्राकडून वारंवार मागणी होत असल्याचे केंद्र समन्वय कार्यशाळा दि. २९/११/२०१७ आयोजित कार्यशाळेत प्रमाणपत्र मिळणेबाबत सूचना करण्यात आ |

| | | |
|---|---|---|
| | | होती. प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यामुळे शिक्षणक्रम प्रचार व प्रसारामध्येही वृद्धी होण्यास मदत<br>गुणपत्रकासोबत प्रमाणपत्रही मिळावे. परीक्षा विभागाच्या प्रतिनिधींनी आम्हाला कळविल<br>करु असे कार्यशाळेत सांगितले होते. चर्चा व मान्यतेसाठी<br>**निर्णय :** विद्याशाखेतील सर्वच प्रमाणपत्र शिक्षणक्रमासाठी गुणपत्रकांबरोबर प्रमाणपत्र देण्य<br>सदर समितीने परीक्षा विभागास केली. शक्य झाल्यास विद्याशाखेने प्रमाणपत्र नमुना परीक्ष<br>तयार करुन द्यावा असे सुचविण्यात आले. आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठ<br>करण्यात आली. |
| | ४९.३.९ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/११<br>**बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम प्रवेशपात्रता इयत्ता १२ वी वरून इ**<br>**१० वी करणेबाबत...**<br>**टिप्पणी :** 'बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र' केंद्रसमन्वयक कार्यशाळा २०१७ मध्ये आय<br>केली होती. प्रवेश संखेच्या समस्यांवर चर्चा करतांना १० वी उत्तीर्ण व्यक्ती प्रवेशास पात्र धरण्यास प्र<br>संख्या वाढू शकते म्हणून या शिक्षणक्रमाची प्रवेशपात्रता इ. १० वी करावी असे वाटते .<br>चर्चा व मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय-** 'बालसंगोपन आणि रंजन प्रमाणपत्र शिक्षणक्रम' प्रवेशपात्रता बारावी ऐवजी दहावी करण्य<br>प्रस्ताव अमान्य करण्यात आला. या प्रमाणपत्र शिक्षणक्रमाचे NCTE 2014 च्या प्री-प्रायम<br>अभ्यासक्रम चौकटीतील पदविका शिक्षणक्रमाचा आधारे पूर्नरचना करावी म्हणजे पुढील काळात<br>शिक्षणक्रमाला NCTE ची मान्यता मिळून या शिक्षणक्रमाची भविष्यकाळात मागणी वाढेल. असे<br>व्यक्त करण्यात आले. |
| | ४९.३.१० | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१२<br>**'शालेय व्यवस्थापन पदविका ' शिक्षणक्रमाच्या पुनर्रचनेसाठी अभ्यासक्रम तज्ज्ञ समिती**<br>**सदस्यांच्या नावास मंजुरी मिळणेबाबत... (सहपत्र — ६)**<br>**टिप्पणी :** 'शालेय व्यवस्थापन पदविका' शिक्षणक्रमाची पुनर्रचना करणे गरजेचे आहे. त्यास<br>शिक्षणक्रमाच्या अध्ययन साहित्याच्या उपयुक्ततेसंदर्भात आढावा घेण्यात येईल, तज्ज्ञ सल्ला<br>मंडळाच्या सहपत्र — ६ मधील नावास मंजुरी मिळणे बाबत...<br>**निर्णय :** 'शालेय व्यवस्थापन पदविका' शिक्षणक्रमाच्या पूर्नरचनेसाठी तज्ज्ञसमिती सदस्य<br>नांवासमोर सदस्यांचे संपूर्ण नांव,पत्ता, पद, शैक्षणिकअर्हता , इ. माहिती सुस्पष्टपणे मांडावी. तसेच<br>वाणिज्य व व्यवस्थापन, अभियांत्रिकी आणि कायदा या क्षेत्रातील प्रत्येकी किमान एक तज्ज्ञ समा<br>करावे असे सूचित करुन मान्य करण्यात आला. आणि सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मि<br>म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.११ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१३<br>**शालेय व्यवस्थापन पदविका मौखिक परीक्षेसाठी बाह्यपरीक्षकांच्या नावास मान्यता**<br>**मिळणेबाबत....**<br>**टिप्पणी :** 'शालेय व्यवस्थापन पदविका' मौखिक परीक्षेसाठी अभ्यास केंद्रावरून बाह्य परीक्षकांच |

| | | |
|---|---|---|
| | | ५ नावे मागविण्यात यावीत. यात शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील प्राध्यापकांचाही समावेश असू शके<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकांनी त्यातील नावांचे प्राधान्यक्रम ठरवावेत. व केंद्रांना कळवावे अ<br>वाटते. चर्चा व मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या मौखिक परीक्षेसाठी शिक्षणशास्त्र विद्याश<br>बाह्य परिक्षकांच्या माहितीबाबतची पेढी (Bank) तयार करावी. त्या पेढीमध्ये प्रत्येक तज्ज्ञांचे संपूर्ण न<br>पत्ता ,पद, शैक्षणिक अर्हता इ.चा समावेश असावा. प्रत्येक अभ्यासकेंद्राला मौखिक परीक्षेस<br>शिक्षणक्रम समन्वयकाने शिक्षणशास्त्र विद्याशाखा संचालकामार्फत तीन नांवे तज्ज्ञ म्हणून कळवा<br>अभ्यासकेंद्र बांह्य परीक्षकांच्या उपलब्धतेनुसार आमंत्रित करतील. असा निर्णय घेऊन सदर विषय<br>विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.१२ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१४<br>**'शालेय व्यवस्थापन पदविका' शिक्षणक्रम मौखिक परीक्षेचे गुण अभ्यासकेंद्राकडून ऑनला पद्धतीने वेळेत न आल्यास ते त्या विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने भरावे.**<br>**टिप्पणी :** विद्यापीठाच्या सर्वच शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्राकडून अंतर्गत गुणांची नोंद ही ऑनला<br>पद्धतीने केली जाते त्यासंदर्भात ऑनलाईन लिंक व विशिष्ट दिनांक दिला जातो. परंतु का<br>अभ्यासकेंद्राकडून ते गुण ऑनलाईन पद्धतीने नोंद केलीजात नाही. अशा वेळी विद्यार्थ्यांच्या निकाला<br>विलंब होतो किंवा ते नापास होतात. तेंव्हा अशा बाबतीत त्या केंद्राचे अंतर्गत गुण नोंद परी<br>विभागाकडून केली जावी. चर्चा व मान्यतेस्तव सादर.<br>**निर्णय :** परीक्षा विभागाने अंतर्गत गुणदान याद्या ऑनलाईन पध्दतीने मागविण्यास सुरुवात केल्यापास<br>काही वेळेस लिंक बंद झाल्याने, किंवा अभ्यासकेंद्राकडून गुण अपलोड करणेचे राहून गेल्याने निका<br>विलंब/ नापास असा येत असला तरी ऑफलाईन पध्दतीने अंतर्गत गुणदान स्विकारण्याचा धोरणात्म<br>निर्णय घेऊ नये. असा निर्णय घेण्यात आला. त्या ऐवजी अशी एखादी बाब झाल्यास ती स्वतंत्रप<br>परीक्षा कक्ष आणि मा. कुलगुरु यांचे निदर्शनास आणून द्यावी, आणि विशेष मान्यता घेऊन निकालाम<br>सुधारणा करावी. असे सुचित करण्यात आले. |
| | ४९.३.१३ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१५<br>**'शालेय व्यवस्थापन पदविका' मौखिक परीक्षा विद्यापीठात घेण्याबाबत...**<br>**टिप्पणी :** D. ED. / B. ED. COLLEGE बंद झालेले आहे. त्यामुळे तेथील DSM केंद्र बंद झाले<br>आहे. अशा केंद्रावरील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी त्या विद्यार्थ्यांची मौखिक परी<br>विद्यापीठामध्ये घेण्यात परवानगी मिळणे बाबत...<br>चर्चा व मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** 'शालेय व्यवस्थापन पदविका' शिक्षणक्रमाच्या बंद झालेल्या अभ्यासकेंद्रातील विद्यार्थ्यांचे हि<br>लक्षात घेता शिक्षणशास्त्र विद्याशाखेने सदर मौखिक परीक्षेचे आयोजन करावे असा निर्णय घेण्यात आल<br>आणि सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.१४ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१६<br>**E37 ग्राम रोजगार सेवक कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम संरचना आणि पाठ्यक्रम कार्योत्तर** |

| | | |
|---|---|---|
| | | मान्यता..........(सहपत्र – ७)<br>**टिप्पणी :**<br>रोजगार हमी योजनेमध्ये कार्यरत ग्राम रोजगार सेवकांना यांच्या कार्यानंदात सुलभता येण्यासाठी सहा महिने मुदतीचा प्रमाणपत्र शिक्षणक्रम नव्याने सुरु करण्यास व त्याच्या पाठ्य कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सदर शिक्षणक्रम संरचना व पाठ्यक्रम, सहपत्र ७ मध्ये मान्यतेसाठी सादर<br>**निर्णय :** 'ग्राम रोजगार सेवक कौशल्य प्रमाणपत्र ' शिक्षणक्रम विकसनापूर्वी या शिक्षणक्रमाच्या अभ्यास (Need Analysis ) करणे आवश्यक आहे. सदर शिक्षणक्रम शासन योजनेवर आधारीत तर शासन हा शिक्षणक्रम सर्व रोजगार सेवकांना अनिवार्य करणार का? तसेच शिक्षणक्रम विकस आर्थिक सहाय्य करणार का या बाबत शासनाकडून खुलासा घ्यावा त्यानंतर सदर शिक्षणक्रम वि करावा असा निर्णय उपरोक्त विषयावर घेण्यात आला. |
| | ४९.३.१५ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१७<br>**ग्राम रोजगार सेवक कौशल्ये प्रमाणपत्र शिक्षणक्रम लेखक,संपादक मंडळ कार्योत्तर मान्यतेबाबत...**<br>**टिप्पणी :**<br>उपरोक्त शिक्षणक्रम विकसना संदर्भात संपादक लेखक मंडळयांस मा. कुलगुरूंनी तत्वत: मान्यता दिलेली आहे. ती नावे कार्योत्तर मान्यतेसाठी सादर.<br>१. मा. श्री. प्रकाश वाघमोडे<br>२. मा. श्री. कैलास मोरे, नाशिक.<br>३. मा. श्रीम. पुष्पा, ग्रामसेवक, निफाड प. स.<br>४. मा. श्रीम. प्रमिला पवार, नाशिक.<br>५. मा. श्री. अनिल बुचकुस, अध्यक्ष नाशिक जिल्हा ग्राम रोजगार सेवक<br>६. श्री. रेखा मोरे, नाशिक.<br>७. मा. श्री. जासिंदार पठाडे<br>८. मा. श्री. विश्वास निरगुडे<br>९. प्रा. विजयकुमार पाईकराव<br>**निर्णय :** 'ग्राम रोजगार सेवक कौशल्ये प्रमाणपत्र' शिक्षणक्रम विकसनास मान्यता न दिल्याने शिक्षणक्रमाच्या लेखक संपादक मंडळाच्या मान्यतेचा विषय सभेपूढे मांडण्यात आला नाही. |
| | ४९.३.१६ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१८<br>**घरकामगार कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणशास्त्र मान्यतेबाबत...**<br>**टिप्पणी :**<br>P37 घरकामगार कल्याण पदविका शिक्षणक्रमाच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार सदर शिक्षण पुनर्रचना पदविकेऐवजी घरकामगार कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम अशी करण्यात आलेली |

त्यातील घरकामगार कौशल्य विकास या विषयाचे लेखन श्री. मिलिंद बाबर यांचेकडून करून घेण्यात येईल. सदर शिक्षणक्रमास व त्याची कार्यवाही जुलै २०१८ पासून करण्यास मान्यता मिळावी.
चर्चा व मान्यतेसाठी सादर...

**निर्णय :** घरकामगार कौशल्य विकास या विषयाचे लेखन श्री. मिलिंद बाबर यांचेकडून करून घेण्यास मान्यता देण्यात आली. निरंतर विद्याशाखेत या संदर्भात पदविका आणि पदवी शिक्षणक्रम सुरु करण्यात आलेला आहे. त्याचाही आढावा घेण्यात यावा. आणि सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली.

---

४९.३.१७

विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१९

**एम. ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमातील संरचनेबाबत...**

**टिप्पणी :**

एम. ए. शिक्षणशास्त्रचा सत्रनिहाय अभ्यासक्रम आहे. यु. जी. सी. नियमानुसार 'ऑडिट कोर्स' ह्या शिक्षणक्रमात समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्या ऑडीट कोर्सची पुढील प्रमाणे विभागणीस मान्यता मिळणेसाठी सादर....

| **पूर्वीचे** | **नवीन बदल** |
|---|---|
| १) द्वितीय सत्र | १) द्वितीय सत्र |
| ऑडिट कोर्स (कोणताही एक) | ऑडीट कोर्स (कोणताही एक) |
| १) सायबर सिक्युरीटी | १) सायबर सिक्युरीटी |
| २) इंग्रजी | २) इंग्रजी |
| ३) फ्रेंच | ३) फ्रेंच |
| ४) अरेबिक | ४) अरेबिक |
| ५) जर्मन | ५) मूल्यशिक्षण |
| ६) संप्रेषण कौशल्य | २) चतुर्थ सत्र |
| ७) ऑफिस ऑटोमेशन | ऑडीट कोर्स (कोणताही एक) |
| २) चतुर्थ सत्र | १) जर्मन |
| ऑडीट कोर्स (कोणताही एक) | २) संप्रेषण कौशल्य |
| १) मूल्यशिक्षण | ३) ऑफिस ऑटोमेशन |
| २) योगशिक्षण | ४) योग शिक्षण |

**निर्णय :** एम.ए. शिक्षणक्रमातील ऑडीट कोर्स सत्रनिहाय विभाजनात केलेला बदल विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयाचा विचार करुन अमान्य करण्यात आला. विद्यापीठाने सर्व पदव्युत्तर व पदवी शिक्षणक्रमांना द्वितीय व चतूर्थ सत्रात कोणते ऑडीट कोर्स द्यावे याचा निर्णय घेतलेला असल्याने त्यात बदल करण्याचा या समितीला अधिकार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| | ४९.३.१८ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/१९<br>**एम. ए. शिक्षणशास्त्र पुनर्रचनेच्या तज्ज्ञ सल्लागार समितीस कार्योत्तर मान्यता देणे ब**<br>**(सहपत्र — ८)**<br>**टिप्पणी :**<br>एम. ए. शिक्षणशास्त्र या शिक्षणक्रमाच्या पुर्नेरचनेसाठी तज्ज्ञ सल्लागार समिती मंडळ मा. कुलगु<br>मान्य करून घेण्यात आले आहे. ते सहपत्र क्र. ८ मध्ये कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** एम. ए. शिक्षणशास्त्र पुनर्रचनेच्या तज्ज्ञ सल्लागार समितीस (सहपत्र 8 मधील ) मान्यत<br>आली , मात्र सदर समितीमधील प्रत्येक सदस्याचे पद शैक्षणिक अर्हता व संपूर्ण पत्ता लिहीण्य<br>असे सुचित करण्यात आले. आणि सदर विषयास विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शि<br>करण्यात आली. |
| | ४९.३.१९ | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/२०<br>**बी. एड. विशेष शिक्षण (HI/VI/MR) शिक्षणक्रमाच्या लेखक, संपादक, प्राश्निक, परीक्षक**<br>**समीक्षक म्हणून यादी मान्यतेसाठी सदर... (सहपत्र — ९)**<br>**टिप्पणी :**<br>बी. एड. विशेष शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रावरील समंत्रक, संयोजक, केंद्रप्रमुख, लेखक, सं<br>प्राश्निक, परीक्षक, समीक्षंक असून त्यांच्या नावाचा समावेश सहपत्र क्र. ९ मध्ये केलेला आहे.<br>यादी मान्यतेसाठी सादर...<br>**निर्णय :** बी. एड. विशेष शिक्षण या शिक्षणक्रमाच्या सहपत्र नऊ मधील लेखक संपादक प्रा<br>परीक्षक,समिक्षक यांच्या यादीतील श्रीमती. ज्योती भोसले यांचे नांव पद्व्युत्तर पदवी नसल्याने वगळ<br>येऊन इतरांस मान्यता देण्यात आली. पुढील काळात अशी यादी तयार करतांना संबधीत तज्ज्ञांची<br>पदवीपेक्षा वरची असेल याची खात्री करण्यात यावी असे सुचित करण्यात आले.आणि सदर वि<br>विद्वत सभेची मान्यता मिळावी म्हणून शिफारस करण्यात आली. |
| | ४९.३.२० | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८/२१<br>**बालसंगोपन रंजन आणि शिक्षण, स्वयं सहाय्य गट प्रेरक / प्रेरिका शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लाग**<br>**समिती सदस्य मान्यतेबाबत... (सहपत्र क्र. १०.१, १०.२)**<br>**टिप्पणी :**<br>शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांची पुनरचना करणे आवश्यक आहे. त्यासाठ<br>सल्लागार समिती निश्चिती करण्यात आलेली आहे.तज्ज्ञ सल्लागार समिती सदस्यांना नावांना<br>मान्यता देणेबाबत...<br>**निर्णय :** बालसंगोपन रंजन आणि शिक्षण, स्वयं सहाय्य गट प्रेरक / प्रेरिका शिक्षणक्रम तज्ज्ञ स<br>समिती सदस्यांना मान्यता देण्यात आली. मात्र प्रत्येक सदस्यांचे संपूर्ण नांव,पत्ता, शैक्षणिक अ<br>इ. लिहून सदर याद्या अद्ययावत कराव्यात असे सुचित करण्यात आले. आणि सदर विषयास<br>सभेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | विषय क्र. बी-१/एफ-१७५/२०१८ /<br>**ऐनवेळेचे विषय :**<br>बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रमाच्या समन्वयक अर्हतेबाबत :<br>**निर्णय :** बी.एड. विशेष शिक्षणक्रमाचे अभ्यासकेंद्र देतांना प्रत्येक अ.केंद्रातील समन्वयक हा RCI ने सूचित केलेल्या तज्ज्ञ अर्हतेनूसार असेल याची खात्री करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.<br>त्यानंतर उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित करण्यात आले. |

डॉ. संजिवनी महाले
सदस्य सचिव,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

डॉ.कविता साळुंके
प्र.संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा